स.फौ.के. नं. ३७२/२०२२

नि. क्र. ११ लगत

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब**

नाव – अनिल प्रकाश मसकर, पो.को. १३५६ संगमेश्वर पो.ठाणे.

वय– २७ वर्षे,

**सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचतर्फे –**

१. दि. २५/११/२०२२ रोजी मला गु.र.नं. ११९/२०२२ मधील जप्त गावठी हातभट्टीची दारुची नमुना बाटली रासायनिक विश्लेषणाच्या अहवालाकरता दि. २५/११/२०२२ रोजी न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा कोल्हापुर येथे जाण्याची ड्युटी लावली होती. सदरच्या बाटल्या माझ्याकडे मुद्देमाल कारकुन व्ही.एस.तांबडे यांनी ताब्यात दिल्या त्याची नोंद स्टेशन डायरीला केलेली आहे. नमुना बाटल्या मी प्रयोगशाळेत पोच केल्या. त्याची पोच मी तपासिक अंमलदारांकडे दिलेली आहे. त्याची पोच पावती मी तपास अधिकारी यांचेकडे दिली. आता मला ती पोच पावती दाखवली. ती तीच असून त्याच्यावर पोच म्हणून लिपीक प्रादेशीक वैज्ञानिक प्रयाोगशाळा कोल्हापुर यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा वबरोबर आहे. सबब **त्यास नि. २०** देणेत येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेतर्फे –**

२. हे म्हणणे खरे आहे की, नि.२० येथील पोच पावतीवर माझी मुद्देमाल ताब्यात घेतल्या बाबत सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी तपासीक अंमलदारांकडे कोणत्या वाहनाने नमुना पोहचवण्यासाठी गेलो त्याचा पुरावा दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.२० वरील पोच पावतीवर मुददेमाल किती वाजता जमा करणेत आला त्याची नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी दि. २५/११/२०२२ रोजी नमुना वाहक म्हणून नेमणुक करणेत आली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.06.30 11:03:19 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक २७/०६/२०२३** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**